पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०५

**सभावृत्तांत**

दिनांक – **२१/०१/२०२१** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **२१/०१/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.बारणे माया संतोष
५. मा.कामठे तुषार गजानन
६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
७. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
८. मा.भाऊसाहेब सोपान भोईर
९. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.चितळे – उप आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) शिक्षण पध्दतीत स्टार्स प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची निवड झाली असल्याने केंद्र शासन व राज्य शासन यांचे अभिनंदन व आभार करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांकरिता मोफत बस पास उपलब्ध करुन देणेबाबत– मा.प्रियांका बारसे , मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

--------------

अ) दिनांक ०७/०१/२०२१ रोजी झालेल्या **सभेचा** ( कार्यपत्रिका क्रमांक **०४** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -**२३** विषय क्रमांक -०१

दिनांक - २१/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

भारतातील सर्व राज्याच्या परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेस कामगिरीच्या आधारावर शिक्षण पद्धतीत स्टार्स प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची निवड करण्यात आलेली आहे. या योजनेत केंद्र शासन ६० टक्के व राज्य शासन ४० टक्के खर्च करणार आहे. सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी ९७६.३९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या निधीतून पूर्व प्राथमिक ते बारावीच्या विद्यार्थींना गतिशील व प्रयत्नातून अध्ययन सुधारणे, शाळांचे शिक्षकांचे प्रशिक्षण व गुणवत्ता वाढीवर भर देणे, विशेष गरजा असलेले बालके मुली व वंचित समुदायातील विद्यार्थी यांच्यावर लक्ष केंद्रित करणे ही या प्रकल्पाची उदिष्टे आहेत. सदर प्रकल्प राज्यात राबविल्यास शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल होइल. तरी शिक्षण पद्धतीत स्टार्स प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची निवड झाली असल्याने केंद्र शासन व राज्य शासन यांचे अभिनंदन व आभारपर ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्रमांक -**२४** विषय क्रमांक -०२

दिनांक - २१/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार राज्यातील इ. ५ वी ते ८ वी शाळा सुरु होणार आहे. आपल्या मनपा शाळेत शिकत असलेल्या काही विद्यार्थी हे शाळेपासून दूर अंतरावर राहत असल्याने त्यांना बसने येण्या-जाण्याच्या दृष्टीने मोफत बस पास देण्याची सुविधा उपलब्ध करून देणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६/२०२१

दिनांक : २१/०१/२००२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.